भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४५४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/०६/२०१७

**१) मागील दाराची टिचकणी उघडुन बेडरूम मधिल आलमारीतील सोन्याचांदीचे दागीने व नगदी पैशाची चोरी केल्याने गुन्हा नोंद .:–**

दिनांक १६/०६/२०१७ चे ९८.५० वा. ते १८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी सौ. मनोरमा सतिष हिंगे वय ४५ वर्ष रा.लाखांदुर ही आपल्या मुलीसह घराला ताला लावुन बाहेरगावी गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादीचे मागील घराच्या मागील दाराची टिचकणी उघडुन आत प्रवेश करून बेडरूम मधिल आलमारीत ठेवलेला नाकातील सोन्याचा खडा २ ग्रॅम, सोन्याचे कानातील वेल ५ ग्रॅम, सोन्याचे टॉप्स ९ ग्रॅम, १५ मनी सोन्याचे २ ग्रॅम, १ सोन्याचा मंगळसुत्र १० ग्रॅम, चांदीच्या पायपटया व छल्ला १८ ग्रॅम, व नगदी १०,०००/रू. असा एकुण ४५,६००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ४५४,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. निंबेकर पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**२) वाहन सार्वजनीक ठिकाणी आमरोडवर थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १७/०६/२०१७ चे १५.३० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन आमरोडवर सार्वजनीक ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या ठिकाणी उभी करतांनी मिळुन आल्याने पोस्टे. लाखांदुर येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. साठवने पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**३) जादुखोर आहेस अशी बदनामी करून डोळयाजवळ उभारीने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १७/०६/२०१७ चे ०७.०० वा. ते ०७.३० वा. दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीचे व गावातील ईतर लोकांचे गावात सार्वजनिक ठिकाणी भिंतीवर पत्रक लावुन तुम्ही जादुखोर आहात अशी फिर्यादीची बदनामी करून फिर्यादीस तु जादुखोर आहेस तु हनुमानाचे मुर्तीवर हाथ ठेवुन शपथ का घेत नाही. असे म्हणुन भांडण करून फिर्यादीचे उजवे डोळयाजवळ उभारीने मारून जखमी केल्याने फिर्यादी मारोती महीपाल टेंभरे वय ५८ वर्ष, रा. हिंगना यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे तुमसर येथे कलम ३२४ भांदवी. सहकलम २ (१) (ख),३ (२) जादुटोना विरोधी कायदा २०१३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. नागरे पो. स्टे तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) कपडे नेल्याच्या कारणावरून भांडन शिवीगाळ करून कुऱ्हाड डोक्यावर लागुन जखमी करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १६/०६/२०१७ चे १९.०० वा. दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीस तु माझ्या पत्नीची अंर्तवस्त्र नेलास असा संशय घेंवुन फिर्यादीस शिवीगाळ, लांबाझोंबी करून लांबाझोंबीत आरोपीचे हातातील कुऱ्हाड फिर्यादीचे डोक्यावर लागुन जखमी करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी भिवा मंगरू चौधरी वय ६५ वर्ष, रा. चन्नेवाडा यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे पवनी येथे कलम ३२४,५०४,५०६ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. पटले पो. स्टे पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

५) सार्वजनिक ठिकाणी दारूच्या नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १७/०६/२०१७ चे १३.३० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल दारू पिऊन दारूचे नशेत सेंदुरवाफा चौक साकोली सर्व्हीस रोडवर वेळी वाकडी चालवीतांनी मिळुन आल्याने त्याची वैधकीय तपासनी केली असता दारू पिऊन दारूचे नशेत असल्याचा अभिप्राय मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. किशोर मेश्राम यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे साकोली येथे कलम १८५ (१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भुतांगे पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

६) मोटार सायकला चालकाच्या निष्काळजीपणामुळे पायी जाणाऱ्या ईसमासधडक मारून जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १७/०६/२०१७ चे १९.१५ वा. दरम्यान यातील फिर्यादी हेमराज पैकुजी हटवार वय २० वर्ष, रा. मुरमाडी/लाखनी हा दिवानी न्यायालया जवळील एनएच ६ रोडवर ऊभा असतांनी यातील अज्ञात आरोपी चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल ही हयगयीने, निष्काळजीपणे रॉग साईडने चालवुन पायी जाणाऱ्या रामदास श्रावण खराबे वय ६५ वर्ष, रा. मुरमाडी/लाखनी यास धडक मारून जखमी करून अपघाताची माहीती न देता भंडाराकडे पळुन गेल्याने फिर्यादी यांचे तोंडी डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे लाखनी येथे कलम २७९,३३७ भांदवी. सहकलम १३४ (ब) मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पो. स्टे. लाखनी हे करीत आहेत.

७) वाहन सार्वजनीक ठिकाणी आमरोडवर थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १६/०६/२०१७ चे २०.१५ वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन आमरोडवर सार्वजनीक ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या ठिकाणी उभी करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोशि. ठवकर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. भंडारा येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

८) लाचेची मागनी करून स्विकारल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १७/०६/२०१७ चे १४.१० वा. दरम्यान यातील आरोपीने तक्रारदार श्री. सुनिल लाखे यांना त्याचे एमए व्दितीय वर्ष नापास झाल्याने त्या वर्षाचे कॉलेज सोडण्याचे प्रमानपत्र (टि.सी.) देण्याकरिता पडताळनी कार्यवाही वेळी ९५०/रू. लाचेची मागनी करून प्रत्यक्ष पडताळनी व सापळा कार्यवाही वेळी तडजोडी अंती ८५०/रू. लाचेची मागनी करून स्विकारल्याने आपले पदाचा वाम व भ्रष्ट मार्गाचा अवलंब केल्याने सरतर्फे फिर्यादी दिनकर चंद्रभान सावरकर वय ५६ वर्ष डिवायएसपी एसीबी कार्यालय भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे अडयाळ येथे कलम ७, १३, (१) (ड) सहकलम १३ (२) भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास डिवायएसपी सावरकर एसीबी भंडारा पो. स्टे अडयाळ हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

९) अवैध देशी/जुगार दारु अडयावर धाडी . :–

दिनांक १७/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, साकोली, पवनी व लाखांदुर येथे अवैध देशी दारु/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ४२ लिटर हातभट्टी दारु, ३५० सडवा साहित्य + १ इंजीन किंमती २७,९५०/–रु, तसेच जुगारातुन किंमती १५३५/–रु. असा एकुण किंमती २९,४८५/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १७/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १६० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०४ तीन सिटर वाहनांवरती १६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १४० केसेस करण्यात आलेल्या आहेत.

18.6

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.